वादीतर्फे साक्षीदार क्र.१- दुर्गाबाई श्रीराम बिरो,

<u>उलट तपास प्रतिवादी क्र. १ आणि २ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. केला यांच्यातर्फे</u>

१०. हे म्हणणे खरे नाही की, साटक मधुन विकलेल्या जमिनीतुन आलेल्या पैशातुन चिखली येथील शेती घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/१२/२००९ रोजीचा मुदतवाढीचा करार होण्यापुर्वी, मला वेळोवेळी रोख आणि धनादेशाच्या स्वरुपात रक्क्म रु. ३ लाख देण्यात आले होते.

प्रश्न- तुम्हाला दिनांक ३०/१२/२००९ रोजी चेक क्र. ८७५८४५, रक्कम रु. १२ लाखाचा चेक देण्यात आला होता ?

उत्तर धनादेश हा अनादरित झाला होता.

११. मला ठेकापत्राची एक प्रत मिळाली नव्हती. हे माझ्या लक्षात नाही की ठेकापत्राची प्रत मी दाव्यात दाखल केली आहे. हे माझ्या लक्षात नाही की कराराची आणि मुदतवाढीच्या कराराची प्रत दाव्यात दाखल केली आहे. दावा दाखल करतांना कोणते कागदपत्र दाखल केले होते हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की कराराची आणि मुदतवाढीची प्रत, सर्वाच्या, माझी, माझ्या भावाची, साक्षीदाराच्या आणि दारोडेची सही झाल्यानंतर, दारोडेने मला दिली होती. हे म्हणणे खरे नाही की दारोडे हा मला सर्व कागदपत्र, व्यवहारात पारदर्शता ठेवण्याच्या उददेशाने देत होता. हे माझ्या लक्षात नाही की २/०५/२०१४ पर्यंत मी मुदतवाढीच्या कराराबाबत कुठेही आक्षेप नोंदविला नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की बारालाखाचा चेक गहाळ झाला आहे असे सांगुन मी दारोडेकडुन बारा लाख रुपये रोख स्वरुपात घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की त्याबददल मी दारोडेला बारा लाख रुपये मिळाल्याचा कबुली लेख लिहून दिला होता.

१३. साक्षीदाराला कबुली पत्रावरील सही दाखविण्यात आली. साक्षीदाराने सागितले की, त्यावर माझी सही आहे. वादीच्या वकीलांनी आक्षेप नोंदविला की, सदर कागदपत्रे एवढया उशिरा दाखल करता येणार नाही आणि त्याची प्रत आम्हाला मिळाली नाही. साक्षीदाराला कबुली पत्रातील मजकुर वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की मला बारा लाख रुपये मिळाले नाही. एकराम बेहरखेडे माझे मामा लागतात. हे मला माहित नाही की एकराम बेहरखेडे याने सही केली होती. माझा मुलगा रमेश बिरोह आहे. त्याची सही कबुलीपत्रावर गफलतीने घेण्यात आली.

प्रश्न- मला व्यवहाराबददलचे रक्कम रु. २०,०४,०००/- दिनांक २०/०१/२०१० रोजी रोख स्वरुपात देण्यात आले होते ?

उत्तर मला सोळा लाख रुपये देण्यात आले होते. मला सोळा लाख रुपये चिखलीचा व्यवहार आणि संपर्ण व्यवहाराबददल मिळाले होते.

१४. शेषराव किसन दारोडे याला मी ओळखत नाही. हे मला माहित नाही या व्यवहाराची उर्वरित रक्कम रु. १२,८७, ५५०/- माझ्या सांगण्यानुसार शेषराव किसन दरोडे याला देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की मी नारद दारोडे याने दिलेल्या चेकचा गैरवापर करुन त्याची फसवणुक केली.

१५. हे म्हणणे खरे आहे की नेमिचंद दारोडे याला मी माझे घर विकले होते. हे म्हणणे खरे नाही की मिळालेल्या पैशाबाबत माझे आणि माझा मुलगा रमेश याचे भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की दिनाक २३/०५/२०१२ रोजी माझा मुलगा रमेश याने माझ्याविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की रमेशने माझ्या विरुद्ध दिलेल्या तक्रारीत असे म्हटले होते की गुप्ता आणि दारोडे यांच्यात झालेल्या व्यवहारातुन जी रक्कम मिळाली होती, त्यातुन कोणतीही रक्कम मला माझ्या आईने दिली नाही. वादीच्या वकीलांनी आक्षेप नोंदविला की, प्रतिवादी यांनी एफ.आय.आर. ची कॉपी आम्हाला दिली नाही आणि उशिरा दाखल केलेली आहे. हे माझ्या लक्षात नाही की रमेश आणि माझ्यामध्ये पोलीस स्टेशनमध्ये समझौता झाला आणि रमेशने तक्रार मागे घेतली. साक्षीदाराला एफ.आय.आर वरिल रमेशची सही दाखविण्यात आली, साक्षीदाराने सांगितले की ती रमेशची सही नाही.

प्रश्न- दारोडे आणि गुप्ता यांनी शेत वाद जमिन राजेश बोकडे आणि बाळकृष्ण शिंगणजुडे यांना विकली ?

उत्तर मी केवळ दारोडेसोबत व्यवहार केला होता.

१६. हे म्हणणे खरे नाही की साटक मधुन मिळालेल्या पैशाचा उपयोग मी माझे कर्ज फेडण्याकामी आणि माझा नवरा मयत झाल्यानंतर, मुलासाठी मी खर्च केले. हे म्हणणे खरे नाही की दारोडेकडुन रोख स्वरुपात मिळालेले पैसे, खर्च करुन राहिलेले पैसे मी बॅंकेमध्ये जमा करत होते. हे म्हणणे खरे नाही की मी २५/१०/२०१० रोजी मिळालेल्या पैशामधुन काही पैसे खर्च करुन, उरलेले पैसे दिनांक २९/१०/२०१० रोजी बॅंकेमध्ये जमा केले. माझ्या कुटुंबामध्ये तीन लोक आहेत. मला दर महिण्याला किती खर्च येतो हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २२/०१/२००९

पासुन दिनांक १६/०१/२०१० पर्यंत, माझ्या म्हण्याप्रमाणे दारोडेने एकुण सात लाख दिले होते आणि त्यपैकी रु. ५,७५,०००/- चार महिण्यामध्ये मी खर्च केले. हे म्हणणे खरे नाही की चेक हा अनादरित झाल्यानंतर दारोडेला मी नोटीस पाठविली नव्हती. सदरची नोटीस मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की नोटीस दिली नव्हती म्हणुन दाखल करु शकलो नाही. हे म्हणणे खरे नाही की आमचा अवाढव्या खर्च भागविण्यासाठी, नारद दारोडेकडुन जास्त पैशाची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की दारोडेने जास्त पैशाची मागणी नाकारल्यामुळे, मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की मी माझे सर्व पैसे बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा- बुटीबोरी येथे जमा करतो. हे म्हण्णे खरे आहे की मी दाव्यात दाखल केलेले, दोन रिपोर्ट हे माझ्या वडीलांनी माझ्यातर्फे पोलीस स्टैशनला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की रिपोर्टवर माझ्या वडीलांनी सही केली होती. हे मला माहित नाही की पहिल्या रिपोर्टची तारिख ही १५/०५/२०१२ होती. हे म्हणणे खरे नाही की रमेशन दिनांक २३/०५/२०१२ रोजी माझ्याविरुद्ध रिपोर्ट दिली होती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ५/०६/२०१२ रोजी मी पहिली रिपोर्ट बदलुन दुसरी रिपोर्ट दिली. हे म्हणणे खरे नाही की सर्व रिपोर्ट माझ्या वडीलांच्या सांगण्यावरुन देण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने मला सौदयानुसार ठरलेली पुर्ण रक्क्म दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीचे पैसे हडपण्याकामी खोटे आरोप केले आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीवर दबाव आणण्यासाठी प्रतिवादीविरुद्ध खोटी रिपोर्ट दिली. हे म्हणणे खरे नाही की मी दिलेल्या तक्रारी खोटया आढळल्यामुळे पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.५ करीता श्री. सारंग देवळे यांच्या करीता पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.12.16 17:51:15 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक १६.१२.२०२५
रामटेक

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : Shri. R. J. Khobragade (Gr.-II)